(५)

क्र.पोमसं/23/प्रथम खबर (FIR)/२३३/२०१८

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
Maharashtra State Police HQ,
जुने विधान भवन, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१
Old Council Hall, Shahid Bhagat Singh Marg,
Colaba, Mumbai - 400 001.
Tel.: 022-2202 6672 (O)

Date : २५/१०/२०१८

पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे
दिनांक 29 OCT 2018
पो.अधि.
अ.पो.अधि.
पो.उप(मु.)
का.अधि.
प्र.लि.
शाखा
आवक क्रमांक

Rdr
Send copy to all.

**विषय :- प्रथम खबर (FIR) घेताना घ्यावयाची दक्षता.**

**परिपत्रक**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पोलीस ठाणेस प्रथम खबर (FIR) घेताना ठाणे अंमलदार यांचेकडून व्यवस्थित, मुद्देसुद व फिर्यादीच्या शब्दात असली पाहिजे. परंतु प्रथम खबर (FIR) व्यवस्थित न घेतल्यामुळे प्रथम खबर (FIR) मधील अनावश्यक मुद्दयांचा आधार घेवून बचाव पक्षाचे वकील आरोपीतास जामीन मिळवून देतात किंवा खटल्यातून निर्दोष मुक्तता होते. त्यामुळे फिर्यादीस न्याय मिळत नसल्याने त्याचा न्यायव्यवस्था व पोलीसांवर विश्वास राहत नाही. यासाठी खालील नमुद मुद्दयानुसार प्रथम खबर (FIR) घेण्याबाबतची कार्यवाही करावी.

१. सर्वांत प्रथम ठाणे अंमलदाराने तक्रारदाराचे म्हणणे योग्यरित्या ऐकून घ्यावे.
२. ठाणे अंमलदाराने तत्संबंधीचे अथवा समर्पक प्रश्न तक्रारदाराला विचारायला पाहिजे.
   उदा. केव्हा, कुठे, कसे, कुणाकडून, कशामुळे ? इत्यादी.
३. तक्रारदाराची तक्रार लिहून घेताना त्याला ज्या महत्वाच्या बाबी समाविष्ट करावयाच्या आहेत, त्या नीट समजून घ्याव्या.
४. तक्रार लिहून घेताना कायदयाची जी कलमे लावावयाची आहेत, त्याबाबत स्पष्टता असायला हवी.
५. तक्रारदाराच्या सांगण्यानुसार FIR नोंदवून तक्रारदाराला वाचून दाखवावी.
६. FIR मध्ये कायदयाची जी कलमे लागू होतात अथवा लावावयाची आहेत, त्या कलमांच्या घटकांचा (Ingredients) समावेश झाला आहे, याची खात्री करावी. (ठाणे अंमलदाराने याचा अभ्यास जेव्हा तो तक्रारदाराला समर्पक प्रश्न विचारतो, त्यावेळी करावयाचा असतो अथवा जेव्हा जी कलमे लावावयाची आहेत, असे फिर्यादी निश्चित करतो, त्याचवेळी करावयाचा असतो.)
   उदा. जर प्रथमदर्शनी फसवणूकीचा गुन्हा होत असेल तर भा.द.वि.कलम-४१५ चे घटक उदा. फसवणूक, प्रलोभन, परिणामी कृती/निष्क्रीयता या क्रमाने तिन्ही घटकांचा फिर्यादीच्या जबाबात त्याच्या शब्दात समावेश असला पाहिजे.
७. जर बळीत (Victim), साक्षीदार आणि इतर व्यक्ती उपलब्ध असले तरी फिर्याद ही बळीत इसमाचीच घ्यावी. जर तो काही कारणास्तव जबाब/फिर्याद देण्यास समर्थ नसेल तेव्हा इतर व्यक्तीची फिर्याद घ्यावी.

Scanned by CamScanner

८. फिर्याद दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे FIR मध्ये तसेच FIR च्या कॉलम नं. ८ मध्ये योग्यरित्या स्पष्टीकरण दिले पाहिजे.
९. जर आरोपी हा/हे अज्ञात असेल/असतील, परंतु फिर्यादीने त्यांना पाहिले असल्यास, त्याचे फिर्यादीत तसेच FIR च्या कॉलम नं. ७ मध्ये योग्य ते वर्णन लिहीले पाहिजे.
१०. फिर्यादीत/FIR मध्ये तक्रारदाराच्या माहितीप्रमाणेच मुद्दयांचा समावेश असेल, याची काळजी घ्यावी.

तसेच सोबत जोडलेल्या तपासणी सूची (चेक लिस्ट) प्रमाणे कार्यवाही करुन, प्रथम खबर (FIR) घेताना दक्षता घेतील.

तरी, सर्व घटक प्रमुखांनी आपल्या अधिनस्त पोलीस ठाण्यांमध्ये वरीलप्रमाणे कार्यवाही करुन, सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार यांना सदरचे परिपत्रक हजेरीवर सलग ०३ दिवस वाचून दाखवतील. तसेच परिपत्रक व तपासणी सूचीची (चेक लिस्ट) एक छायांकित प्रत ठाणे अंमलदार कक्षात ठेवतील. जेणेकरुन, फिर्याद घेताना फिर्यादीमध्ये आवश्यक ते मुद्दे लिहावयाचे राहणार नाहीत. याप्रमाणे कार्यावाही होते किंवा नाही ? याबाबत घटक प्रमुख वेळोवेळी आढावा घेतील.

( दत्ता पडसलगीकर )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.

**प्रति :-**

१. सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
२. सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)
३. सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र.
२/- भेटी दरम्यान वरील सूचनांची अंमलबजावणी होते किंवा नाही ? याबाबत खात्री करतील.

**प्रत माहितीसाठी :-**

१. अपर पोलीस महासंचालक, (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. विशेष पोलीस महानिरीक्षक, (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Scanned by CamScanner

# चेक लिस्ट

| अ.क्र. | प्रश्न | | |
|---|---|---|---|
| १. | प्रथम खबरी अहवालामध्ये घटना घडल्याचा कालावधी व ठिकाण स्पष्टपणे नमुद करण्यात आला आहे का ? | होय | नाही |
| २. | घटना घडल्या नंतर गुन्हा दाखल करण्यास विलंब झाला आहे काय ? | होय | नाही |
| ३. | विलंब झाला असल्यास विलंबाचे कारण स्पष्टपणे नमुद करण्यात आले आहे काय ? | होय | नाही |
| ४. | गुन्हयात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत काय ? | होय | नाही |
| ५. | त्यांची नावे व कृती प्रथम खबरीमध्ये नमुद करण्यात आली आहेत काय ? | होय | नाही |
| ६. | प्रथम खबरी अहवालामध्ये आरोपीतांची नावे निष्पन्न झाली आहेत काय ? | होय | नाही |
| ७. | आरोपी ज्ञात असल्यास त्याचे नांव, पत्ता व इतर तपशिल नमुद करण्यात आला आहे काय ? | होय | नाही |
| ८. | प्रथम खबरी अहवालात आरोपी अनोळखी असल्यास, त्या आरोपीची/संशयितांची सविस्तर वर्णने नोंद केली आहेत काय ? | होय | नाही |
| ९. | आरोपी अनोळखी असल्यास त्याचे परीपूर्ण वर्णन घेण्यात येऊन "त्यास मी परत पाहिले असता ओळखेन "असा उल्लेख करण्यात आला आहे काय ? | होय | नाही |
| १०. | प्रथम खबरी अहवालात प्रत्येक आरोपीची कृती नमुद आहे काय ? | होय | नाही |
| ११. | गुन्हयाचा हेतू स्पष्ट झाला आहे काय ? | होय | नाही |
| १२. | गुन्हयाचा हेतू स्पष्ट झाला असेल, तर प्रथम खबरी अहवालामध्ये तसा उल्लेख केला आहे काय ? | होय | नाही |
| १३. | प्रथम खबरी अहवालामध्ये गुन्हयात वापरलेल्या हत्यारांची वर्णने नमूद करण्यात आली आहेत काय ? | होय | नाही |
| १४. | प्रथम खबरी अहवालामध्ये फिर्यादीच्या अंगावर जखमा झाल्या असल्यास, त्यांचा उल्लेख करण्यात आला आहे काय ? | होय | नाही |
| १५. | जखमा कोणत्या हत्याराने झाल्या आहेत त्या हत्याराचा उल्लेख करण्यात आला आहे काय ? | होय | नाही |
| १६ | प्रथम खबरी अहवालामध्ये गुन्हयात चोरीस गेलेल्या मालाचे वर्णन नमुद करण्यात आले आहे काय ? | होय | नाही |
| १७ | प्रथम खबरी अहवालामध्ये गुन्हयात वापरलेल्या वाहनाचे वर्णन नमुद करण्यात आले आहे काय ? | होय | नाही |
| १८ | तक्रारदाराच्या सांगण्यानुसार FIR नोंदवून तक्रारदाराला वाचून दाखविण्यात आली आहे काय ? | होय | नाही |
| १९ | प्रथम खबर अहवालाच्या प्रतीवर फिर्यादीची सही अगर अंगठयाची निशाणी घेतली आहे काय ? | होय | नाही |
| २० | प्रथम खबर अहवालाची एक प्रत फिर्यादीस विनामुल्य दिली आहे काय ? | होय | नाही |

Scanned by CamScanner